दिनांक २३/०१/२०२४

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २२/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे नागपुरी गेट अप नं २३/२०२४ कलम ३२४. ५०४ ३४भादवी | यास्मीन नगर अमरावती | दि.२२.०१. २४ चे १७. ३० दरम्यान दि. दि.२२. ०१.२४ चे १९.१७ वा | शेख शब्बीर शेख समद रा अमरावती . | १ एक महीला २ मोहम्मद सादीक रा अमरावती . . | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमूद घ ता वेळी व ठिकाणी फीर्यादी च्या गल्लीत शेख उमर यांचे ईथे कार्यक्रमाचा शामियाना असल्याने फीर्यादीचा ॲटो घरापासुन काही अंतरावरच अलीकडेच लावला असता १७.३० दरम्यान पून्हा ॲटो काढून धंदयावर जाण्यास निघाला असता ॲटो मध्ये एक महीला हिच्या मूलाने संडास केल्यावून फीर्यादीने एक महीला हिचया आईला त्याबाबत सागितले व त्यावून फीर्यादी व आरोपीचे आईचे बोलचाल चालू असतांना आरोपी क १हिने फीर्यादीच्या डोक्यावर मागून लाठीने वार केला व डोक्यावर रक्त निघाले तसेच आरोपी क २ याने फीर्यादीची कॉलर पकडून शिवीगाळ केली अशा फीर्यादीचे जबानी रीपोर्ट वून मेडीकल सर्टी वून सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजापेठ अप क्रमांक ५६/२०२४ कलम, ४५४, ४५७, ३८० भादवी | अमरावती | दिनांक २२/०१/२४ चे १६.०० ते २०.०० दरम्याण दा ता वेळ दिनांक २२.०१.२० २४ चे २२.५२ वा | एक महीला | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमूद घ ता वेळी व ठीकाणी यातील फीर्यादीचे भावाने बिशी भरण्यासाठी पिशवीत ५००० रु ठेवलेले होते व रुमला लॉक लावुन तो डयुटीवर गेला होता व जेव्हा फीर्यादी ही डयुटीवरुन घरी आली असता तिला रुमचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले तीने आत प्रवेश करुन पाहीले असता रुम मधील पिशवी मध्ये ठेवलेले नगदी ५००० रु तिला दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात चोराने दरवाज्याचे कुलुप तोडुन आत प्रवेशकरुन पिशवीतीन नगदी ५००० रु चोरुन नेले अशा फि.चे जबाणी रीपोर्ट वरून सदरचा गून्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र. ८७/२४ कलम- २७९,३३७, भादवी | सार्वजनिक रोड नवसारी राजपूत ढाबाजवळ अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.२२.१..२०२४ चे०७.४५ वा गु.दाखल ता. वेळ दि.२२.१.२०२४ चे १८.५७ वा | तेजस अशोकराव वाकोडे वय २४ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा. वनश्री कॉलणी परतवाडा कांडली ता अचलपूर जि अमरावती | एमएच २७ डी ए ७९९६ (टाटा एक्सप्रेस) चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे प्रकाश साळकर यांचेकडे ड्रायव्हर म्हणून काम करतात. नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फीर्यादी हे त्यांचे गाडी मालक प्रकाश बळवंत साळकर वय ६९ वर्ष रा वनश्री कॉलणी यांना त्यांची चारचाकी वाहन क्र एम एच २६ व्ही ६५३३ ( पांढरी टाटा इंडीगो) ने अमरावती रेल्वे स्टेशन वरुन परतवाडा येथे जाण्याकरीता निघाले असता ०७.४५ वा दरम्यान राजपूत ढाबा चौक येथे रींग रोडवरुन टाटा एक्सप्रेस एम एच २७ डी ए ७९९६ या सवारी चारचाकी गाडी चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने आणून फीर्यादीच्या वाहनाला जोरदार धडक दिली. त्यामुळे फी ला डोक्याला मुक्का मार लागला तसेच फीर्यादी यांचे कार मालक यांना डोक्याला उजव्या साईडला , उजव्या खांदयाला मार लागून जखमी झाले तसेच डाव्या पायाला मुक्का मार लागला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र. ८८/२४ कलम- २७९,३३७, भादवी | राजपुत ढाबा चौक अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.२२.१..२०२४ चे०७.४५ वा गु.दाखल ता. वेळ दि.२२.१.२०२४ चे १९.२५ वा | जगदीश रामराव वानखडे वय ५२ वर्ष व्यवसाय इ नोकरी रा. जिल्हा परीषद शाळेच्या मागे शेगाव ड अमरावती | एमएच २६ व्ही ६५३३ चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फीर्यादी यातील फिर्यादी हे त्यांची टाटा मॅजीक क्र एम एच २७ डी ए ७९९६ नांदगाव येथील गोल्डन फायबर कंपनी येथील मजुर वर्ग घेवून रींग रोडने लालखडी कडे जात असतांना नवसारी रोडकडून येण-या इंडीगो कार क्र एम एच २६ व्ही ६५३३ ( इंडीगो कार ) ने फीर्यादीच्या टाटा मॅजीकला जोरदार धडक दिली. त्यामुळे फी ची गाडी थोडी पलटली. फीला डोक्याच्या मध्यभागी मार लागला. व डाव्या पायाला टोंगळयाला ,कमरेला मार लागला. व छातीला मुक्का मार लागला. तसेच गाडीत बसलेल्या चार ते पाच बायांना मुका मार लागला. मुलाने पी डी एम सी दवाखाना येथे उपचाराकरीता भरती केले. फीचे गाडीचे हेडलाईट फुटलेले आहे. तसेच डाव्या बाजूचे समोरील दार चपकलेले आहे. तसेच समोरील काच फुटलेला आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अप.क्र. ६४/२०२४ कलम ४४८, ४५१, ४२७, ३४ भा. द. वि. | . भुमीपुत्र कॉलनी जिल्हा तैलीक समिती, अमरावती. | .दि. २३.१२.२०२३ चे १२.०० वा. दरम्यान. दाखल ता वेळ - दि. २२.१.२०२४ चे १७.२३ वा. | . राजेश बाबासाहेब शिरभाते, रा. शिरभाते मंगल कार्यालय जवळ, मोती नगर पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती | १) दिनेश बिजवे ,२) सुरेश बिजवे, ३) दिपक गिरोळकर, ४) योगेश मावळे, सर्व रा. अमरावती. | .हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नोंदणीकृत तौलीक समिती संस्था नो. क्र. २९२६/९२ चे निवडुन आलेले अध्यक्ष असुन कार्यकारकणी विरुध्द संस्थेच्या संचालक मंडाळाता यातील नमुद आरोपी असुन त्यांनी फिर्यादीच्या विरुध्द धर्मदाय आयुक्त, अमरावती यांच्याकडे तक्रार दिल्यावर फिर्यादी यांना अध्यक्ष पदावरुन हटवुन यातील आरोपी क्र. १ यांना अध्यक्ष पद देण्यात आले होते. त्यावर फिर्यादी यांनी उच्च न्यायालय नागपुर खंडपीठ येथे रिट याचीका दाखल केल्याने मा. न्यायालयाने धर्मदाय आयुक्त यांच्या निर्णायास स्थगिती दिली. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्याकडे कार्यभार असलेल्या संस्थेत हस्तक्षेप करुन नमुद आरोपींनी स्थंस्थेच्या गेट चे कुलुप तोडुन स्थंस्थेच्या आवारात प्रवेश करुन आतील सभागृहातील वस्तुंची नासधुस केल्याचे दिसले. आरोपींनी संगमत करुन फिर्यादी अध्यक्ष असलेल्या संस्थेत प्रवेश करुन वस्तुची नासधुस केली फिर्यादीच्या अंगावर गेले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर. अप.क्र. ६६/२४ कलम ४३६ भा. द. वि. | श्याम नगर , अमरावती. | घटना ता वेळ - दि. २२.१.२०२४ चे ११.०० ते १३.२० वा. दरम्यान. दाखल ता वेळ - दि. २२.१.२०२४ चे १८.०८ वा. | गंगाप्रसाद नथ्थुलाल जयस्वाल धंदा मजुरी, रा. श्याम नगर, अमरावती. | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादीचे १५ रुमचे घर असुन त्यातील काही रुम भाड्याने दिलेलेल्या आहेत. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी नातेवाईकांकडे लग्ना करीता गेलो असात भाडेकरु प्रिया पवार हिने फ ोन करुन सांगीतले कि, तुमच्या घराला आग लागलेली आहे. वरुन फिर्यादी आले तेव्हा घरा समोर गर्दी जमलेली दिसली व अंग्नीशामक दलाच्या गाड्या आग विझवत होत्या आगीत घरातील बेडरुम मधील गाद्या, पुस्तके, टी. व्ही. भिंतीवरील फॅन, कपडे जळुन नुकसान झाले. कोणीतरी अज्ञात आरोपी आग लाऊन अपक्रिया केली आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिप ोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. फ्रेजरपुरा, | अप. क्र. ६५/२०२४ कलम ६५(ई) महा. दा. का. | आरोपीचे राहते घरासमोर बागळे ले आ ऊट महादेवखोरी, अमर ावती. | घटना ता वेळ. २२.१.२०२४ चे ११.५५ वा. | दाखल ता वेळ - दि. २२.१.२०२४ चे १७.५३ वा. | सरतर्फे पो. हे. कॉ. सुनिल सोळंके, ब. नं. २८९, पो. स्टे. फ्र ेजरपुरा, अमरावती शहर. | मोहन सहदेवराव रामटेके, वय ५२ वर्ष, रा. बागळे ले आऊट महादेवखोरी, अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांची पो. नि. सा यांचे आदेशाने पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग असतांना यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदारुकडुन मिळालेल्या खात्रीलायक माहितीवरुन दोन पंचा समक्ष प्रो. रेड केली असता आरोपीच्या ताब्यात एकुण १० नग १८० मी.ल ी. च्या देशी दारु बॉबी संत्रा च्या पावट्या कि. अं. ७००/- रु. चा प्रोव्ही माल. आ र ोपी कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का अन्वये होते. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे मर्ग क्र.04/2024 कलम 174 जा.फौ.प्रमाणे दाखल. | शिराळा | दि. २२/१/२०२४चे 9.00 वा - | बबलु भाऊराव रोडे (इंगळे) वय 40 वर्ष ताज नगरचांदुर बाजार जि.अम. | एक महीला | मृत्यचे कारण- Brought Death | आज दि. २२/१/२०२४चे9.00 ते21.00वा. डि.ओ. ड्युटी दरम्यान ग्राम शिराळा पोलीस पाटील यांनी माहिती दिली कि, शिराळा फाट्या पासुन चांदुर बाजार रोड कडे 150 मी अंतरवर एक इसम रोड लगत पडलेल्या अवस्थेत आहे. वरुन पोहे का 1067,पो.कॉं 122 यांचे सह घटनास्थळी जाउन चौकशी केली सदर इसमाचे नाते वाईक तेथे आले. पंचा समक्ष सदर इसमाची ज्याचे एक महीला यांचे कडुन ओळख पटवुन घेतली तिने सदर इसमाचे नाव बबलु भाउराव रोडे( इंगळे) वय 40 वर्ष रा. चांदुर बाजार असेअसल्याचे सांगितले. सेकंड मोबाईलने HC 1067,PC 122 यांचे हस्ते वैद्यकिय कार्यवाही कामी इर्विन दवाखाना येथे पाठविले असता डॉक्टरांनी सदर इसमास मृत घोषित केले. मृत इसमाची नाते वाईक यांचे जबाणी रिपोर्ट मध्येसांगित लेकी, सदर मृत इसम फिर्यादीचा चार भावा पैकी सर्वात लहान भाउ आहे. त्याचे लग्न झालेले नाही. तो मजुरी करीत असुन दारु पिण्याच्या सवयीचा होता. आज. दि. 22/01/2024 रोजी सकाळी 9.00 वा. दरम्यान | तपासी अधिकारी – पोउपनि मामनकर पोस्टे वलगाव अमरावती शहर. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | फिर्यादीला तिचा मुलगा नामे अजय भारत तायडे यांने फोन व्दारे माहिती दिली की, मामा बबलु भाउराव रोडे (इंगळे) हा वय 40व र्ष अमरावती ते चांदुर बाजार रोडवर शिराळाफाट्य च्या समोर चांदुर बाजार रोड कडे 150 मी. वर पडलेल्या अवस्थेत आहे. वरुन फिर्यादी मत कास पाहाण्याकरीता आले असता फिर्यादीचा भाउ रोड वर विजय मालवेयांचे शेताजवळ मरण पावला आहे. चित्ती सपडुन आहे. वरुन फिर्यादीच्या मुलांनी पोलीस स्टेशनला तसेच पोलीस पाटील यांना माहिती दिली. फि.ने सांगितले की, माझ्या भावाचे मरणास माझा कोणावर ही संशय नाही. तो अती दारुच्या सेवनाने रात्रीच्या थंडीत मरण पावला असावा. करीता मी जबाणी रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल | |